www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१७ - अंक २ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून

केंद्र सरकारने प्रामुख्याने गेल्या वर्षापासून धाडसी आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी सुरू केली, त्यांपैकी नोटबंदी हा अतिशय क्रांतिकारी व भविष्यकाळात अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणारा निर्णय ठरत आहे. त्याच्या पुढे जाऊन सरकारने १ जुलै २०१७ रोजी बहुचर्चित वस्तू व सेवा कर कायदा देशात लागू केला. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरची सर्वांत मोठी कर सुधारणा अस्तित्वात आली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. वस्तू व सेवा करावर प्रसार माध्यमांतून बऱ्याच उलटसुलट चर्चा चालू आहेत. कोणताही बदल होत असताना, तो अंगवळणी पडेपर्यंत हे वाद चालू राहतील. परंतु वस्तू व सेवा कराचे दूरगामी सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहेत.

या नवीन कर रचनेमुळे करांचे जाळे अधिक विस्तारले जाईल व सरकारचे महसुली उत्पन्न वाढेल; शिवाय तंत्रज्ञानावर आधारित सर्व कर विवरणे भरायची असल्याने, व्यवहारातील पारदर्शकता जपली जाणार आहे. या करांचा लाभ सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था या कररचनेमध्ये असल्याने, अप्रत्यक्ष करांमुळे होणारी महागाई वाढण्याची शक्यता नाही, यावर तज्ज्ञांचे एकमत होत आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा शुभ संकेत आहे. महागाई दर नियंत्रणात राहिल्यास रिझर्व्ह बँकेला व्याज दर कपात करावयास वाव मिळेल व त्याचा सकारात्मक परिणाम व्यवसायचक्रावर होऊन ते पुन्हा गती घेईल, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

अर्थव्यवस्थेला गती येण्यासाठी बँकिंग क्षेत्रही आर्थिकदृष्ट्या भक्कम व संवेदनशील असणे गरजेचे असते. रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेल्या Financial Stability Report मध्ये बँकांची ढोबळ अनुत्पादित कर्जे सरासरी १०% पर्यंत पोहोचतील, असे अनुमान वर्तवले आहे. या पार्श्वभूमीवर ही बाब निश्चितच चिंता करायला लावणारी आहे. अनुत्पादित कर्जाच्या संकटावर मात करण्यासाठी सरकारने Insolvency and Bankruptcy Code २०१६ कायदा पास करून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. बँकांची वसुली गतिमान होण्यासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत; परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्या कायद्यांची परिणामकारकता दिसत नाही. त्या दृष्टीने सरकारने भविष्यकाळात प्रचलित व्यवस्था अधिक गतिमान करावी, अशी अपेक्षा आहे. सरकार धाडसाने राबवत असलेल्या आर्थिक सुधारणांची पार्श्वभूमी विचारात घेता, ही अपेक्षा सरकारकडून निश्चित पूर्ण होईल, अशी मला खात्री वाटते.

सरकारच्या आर्थिक सुधारणांचा बँकिंग क्षेत्रावर प्रभाव पडणे स्वाभाविक आहे. अर्थव्यवस्थेच्या निकोप विकासासाठी, बँकांचे कर्ज वितरण महत्त्वाची भूमिका निभावत असते. हे कर्ज वितरण सदोष व अचूक होण्यासाठी कर्जदाराच्या > पान ३ वर...

# बँकेच्या अध्यक्षपदी मा. श्री. संजय लेले, उपाध्यक्षपदी मा. श्री. जगदीश कदम यांची एकमताने निवड



**बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. संजय लेले यांचा सत्कार करताना बँकेचे निवडणूक निर्णय अधिकारी मा. आनंद कटके सोबत नवनिर्वाचित उपाध्यक्ष मा. जगदीश कदम व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर**

**पुणे** : बँकेच्या अध्यक्षपदी मा. श्री. संजय लेले तर उपाध्यक्षपदी मा. श्री. जगदीश कदम यांची एकमताने निवड करण्यात आली. बँकेचे निवडणूक निर्णय अधिकारी मा. श्री. आनंद कटके (जिल्हा उपनिबंधक, पुणे ग्रामीण) यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित संचालक मंडळाची पहिली बैठक झाली. या बैठकीमध्ये ही निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांची मुदत २०१७ ते २०२२ या पाच वर्षांसाठी राहणार आहे. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री. संजय जाधव व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर उपस्थित होते.

बिनविरोध निवडून आलेले संचालक पुढीलप्रमाणे -

(१) सर्वसाधारण मतदार संघ - श्री. विद्यानंद देवधर, श्री. जगदीश कदम, डॉ. मधुरा कसबेकर, श्री. बिरू खोमणे, श्री. संजय लेले, सीए श्री. माधव माटे, श्री. सुनील मुतालिक, सीए श्री. सुधीर पंडित, श्री. प्रभाकर परांजपे, श्री. लक्ष्मण पवार, श्री. महेंद्र पवार, सीए श्री. मोहन फडके, श्री. किशोर शहा व श्री. अमित शिंदे

(२) अनुसूचित जाती जमाती राखीव मतदारसंघ - श्री. रामदास शिंदे

(३) महिला राखीव मतदार संघ - ॲड. गौरी कुंभोजकर व ॲड. अलका पेटकर.

तसेच संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत मा. श्री. अरविंद खळदकर आणि मा. श्री. विजय भावे यांची तज्ज्ञ स्वीकृत संचालकपदी एकमताने नियुक्ती करण्यात आली.

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## स्वरंग पुंडलिकचे स्पृहणीय यश



सांगली शाखेचे कर्मचारी सचिन पुंडलिक यांचे सुपुत्र स्वरंग सचिन पुंडलिक याने IISER Kolkatta (Indian Institute of Science Education & Research) या संस्थेतून BS (Bachelor of Science), MS (Master of Science) असा Dual Degree Course यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. त्याचा BS-MS साठी Biology हा विषय होता. हा कोर्स त्याने 'A' Grade मध्ये पूर्ण केला असून pointer (Marks) 9/10 प्राप्त झाले आहेत.

या कोर्समध्ये त्याने Regulation of Nuclear Cytosplasmic Translocation of RNA-Binding Protein HUR under Inflammation या विषयावर Thesis (शोध निबंध) केलेला आहे.

या Thesis मध्ये एखाद्या जिवाणूमुळे जेव्हा एखाद्या अवयावास सूज येते, तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवण्याची पेशीच्या केंद्रकात (Nucleus) असेलेले HUR नावाचे प्रोटीन केंद्रकाबाहेर येते. हे प्रोटीन बाहेर येण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास Thesis मध्ये करण्यात आला आहे.

स्वरंग आता NCBS (National Centre for Biological Science) मध्ये Ph.D. करणार आहे.

## तनया पटवर्धन १२ वी कॉमर्स परीक्षेत पुणे विभागात प्रथम



शनिवार-नारायण पेठ शाखेतील खातेदार मे. साई एंटरप्रायझेसचे मालक श्री. अनंत व सौ. अमिता पटवर्धन यांची कन्या कु. तनया यांनी इयत्ता बारावी कॉमर्सच्या बोर्डाच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले असून पुणे विभागात त्या ९४% हून अधिक गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

कु. तनया यांचेही शाखेत सेव्हिंग खाते आहे. त्यांच्या या यशाचे कौतुक म्हणून शाखेत त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी मा. शाखा संपर्क संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर, स्थानिक सल्लागार समिती सदस्य अमृता संभूस, खातेदार सौ. अमिता पटवर्धन तसेच शाखेतील सेवक वर्ग उपस्थित होता.

## रुचिता भुजबळला राज्य नाट्यस्पर्धेत पारितोषिक प्राप्त



शाखेकडील वरिष्ठ अधिकारी श्री. तात्याबा भुजबळ यांची मुलगी कु. रुचिता भुजबळ यांनी लिहिलेल्या व अभिनय केलेल्या 'डेज आर नम्बर्ड' या राज्य नाट्य स्पर्धेतील नाट्यातील उत्कृष्ट अभिनयाबद्दल महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचेकडून अभिनय गुणवत्ता पारितोषिक व प्रमाणपत्र मिळाले.

## सांगली शाखेतील खातेदारांची विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी

सांगली शाखेकडील खातेदार श्री. दादासो दत्तू मदने व सुशांत सुहास घोरपडे यांची महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झाली असून ही बाब शाखेसाठी निश्चितच अभिनंदनीय आहे.

शाखेतील सेवक व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच श्री. राजेंद्र शिदोरे यांची अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी प्रमुख पंच म्हणून निवड केली आहे. त्याचप्रमाणे कुपवाड (सांगली) येथे झालेल्या सूरज आंतरराष्ट्रीय मानांकन स्पर्धेसाठीदेखील श्री. शिदोरे यांनी प्रमुख पंच म्हणून काम पाहिले.

थायलंड येथे झालेल्या साउथ एशियन पिटबॉल स्पर्धेत सांगली शाखेचे खातेदार चि. शांतीनाथ कर्वे याने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले. तसेच स्पर्धा जिंकून सुवर्णपदक पटकाविले.

## ओतूर ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सदस्य मा. संतोष तांबे यांचा सत्कार



ओतूर ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सदस्य व शाखेचे सन्माननीय खातेदार मा.श्री. संतोष देविदास तांबे यांचा ओतूर शाखेच्या वतीने सत्कार करताना ओतूर शाखेचे शाखा व्यवस्थापक मा.श्री. बाबासाहेब हरि जाधव व स्थानिक सल्लागार समिती सदस्य मा. श्री. माणिकशेठ वाळेकर आणि मा. श्री.डॉ. भरत घोलप व शाखेतील कर्मचारी वृंद.

# जनता सहकारी बँक दीपस्तंभासारखी : खा. विनय सहस्त्रबुद्धे

**चिपळूण :** असंख्य संकटांवर मात करून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेणारी जनता सहकारी बँक पुणे ही दीपस्तंभासारखी आहे. या बँकेचा प.पू. डॉ.हेडगेवार पुरस्कार देऊन गौरव करणे हे औचित्यपूर्ण म्हणावे लागेल, असे प्रतिपादन भाजपाचे अखिल भारतीय उपाध्यक्ष, खा. विनय सहस्त्रबुद्धे यांनी येथे केले.

लो. टिळक स्मारक वाचन मंदिराच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प. पू. डॉ हेडगेवार पुरस्कार खा. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते बँकेस रविवार दि. २८ मे रोजी प्रदान करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. बँकेचे मा. अध्यक्ष अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. संजय लेले, संचालक मा. विजय भावे आणि श्री. म. म. पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. स्मृतिचिन्ह, उपरणे, ग्रंथ व रुपये २५ हजार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर लगेचच बँकेने रुपये २५ हजार संस्थेच्या सामाजिक उपक्रमासाठी प्रदान केले. अध्यक्षस्थानी ॲड. बाबासाहेब परुळेकर उपस्थित होते.

खा. सहस्त्रबुद्धे म्हणाले, ''निष्ठा, समर्पण, त्याग आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या संस्थांच्या मागे समाजाने उभे राहण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. चांगले काम करणाऱ्या संस्थांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे म्हणजेच, असा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करणे होय.''

सध्या आपल्या आजूबाजूला उद्देश हरविलेल्या, जबाबदारीबाबत उदासीन असणाऱ्या, अस्सलपणाविषयी शंका वाटणाऱ्या आणि नातेसंबंधांपासून दूर गेलेल्या संस्था, संघटना बघायला मिळतात, असे सांगून सहस्त्रबुद्धे म्हणाले की, संस्था, संघटना बांधणीचे एक शास्त्र आहे. हे शास्त्र कोठेही शिकविले जात नाही. ते शिकवण्याची आवश्यकता आहे. अनेक संकटांवर मात करत संस्था उभी कशी करायची, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जनता बँक. ही बँक म्हणजे दीपस्तंभासारखी आहे.

बँकेचे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर म्हणाले की, बँकेला सामाजिक कार्यासाठी संस्थेने गौरविले, याचा मला अतिशय आनंद झाला. बँका व्यापारी वृत्तीने काम करीत असतात. होणाऱ्या नफ्यातून सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून समाजजीवनाला आर्थिक मदतीचा स्पर्श केला जातो. लो. टिळक स्मारक वाचन मंदिराने आम्हाला पुरस्कार दिला त्यामुळे आम्ही गौरवान्वित झालो. या पुरस्काराचे मोल वेगळेच आहे. ते आम्ही शब्दांत व्यक्त करू शकत नाही. जनता बँकेने अनेक संकटांवर मात करून जी भरारी घेतली, त्यामध्ये बँकेचे ग्राहक, सभासद, कर्मचारी आणि संचालक मंडळ यांचा मोलाचा वाटा आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच आम्हाला हे काम साध्य करणे सहज शक्य झाले.

ॲड. बाबासाहेब परुळेकर यांनी अध्यक्षीय मनोगतात बँकेच्या कार्याचा गौरव केला. कार्याध्यक्ष श्री. प्रकाश देशपांडे यांनी प्रास्ताविकात पुरस्कारामागील भूमिका विशद केली. श्री. मधुसूदन केतकर यांनी आभार मानले.



**लो. टिळक स्मारक वाचन मंदिराच्या वतीने देण्यात येणारा प.पू. डॉ. हेडगेवार पुरस्कार यंदा जनता सहकारी बँक पुणे या संस्थेच्या सामाजिक कार्यासाठी प्रदान करण्यात आला.**

---

➤ पान १ वरुन...

## अध्यक्षांचे लेखणीतून...

व्यवसायाची, त्याच्या आर्थिक स्रोतांची अचूक माहिति मिळणे आवश्यक असते. वस्तू व सेवा कर कायदा, नोटबंदी, अशा आर्थिक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांना किमान आर्थिक शिस्त येईल, अशी खात्री वाटते. त्यामुळे भविष्यकाळात बँकांच्या कर्ज मालमत्तांचा दर्जा सुधारून बँकांचा आर्थिक पाया अधिक भक्कम होईल, याबाबत कोणाचेही दुमत असणार नाही.

या सकारात्मक पार्श्वभूमीवर जनता बँकेनेही सरकारच्या आर्थिक सुधारणांचा कमाल लाभ उचलत आपली आर्थिक कामगिरी अधिक गुणवत्तापूर्ण व वेगवान करण्याचा निश्चय केला आहे. बँकेने आपल्या शाखांचे जाळे गेल्या तीन वर्षांत दुपटीने वाढवले आहे.

नजीकच्या काळात २ नवीन शाखा सुरू होत आहेत. त्याचबरोबर अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत बँकिंग सेवा आपली बँक देत आहे. बँकेने आपला स्वत:चा Unified payment Interface (UPI) सुरू करून कॅशलेस व्यवहारांचे नवे दालन ग्राहकांसाठी खुले केले आहे. या घडीला नवीन पिढीच्या बँका देत असलेल्या सेवेच्या बरोबरीने आपली बँक ग्राहकांना सेवा देत आहे. Small Finance Banks, Payments Bank यांनी सहकारी बँकिंग क्षेत्राला मोठी स्पर्धा निर्माण केली आहे. गुणवत्तापूर्ण व वेगवान सेवेच्या माध्यमातून जनता बँक या आव्हानाचे संधीत रूपांतर करेल, याची मला खात्री आहे.

गरुडझेपमधील हे अध्यक्षीय मनोगत माझे अखेरचे आहे. यानंतर वेगळ्या लेखांमधून भेटत राहू. नव्या अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे या निमित्ताने मी स्वागत करतो. नवनिर्वाचित संचालक मंडळीस माझ्या शुभेच्छा!

## माहे एप्रिल ते जून २०१७ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. मुकुंद गो. कुलकर्णी | उपमहाव्यवस्थापक | विधी वसुली |
| श्री. मनोहर दि. देशमुख | वरिष्ठ अधिकारी | हिशोब |
| श्री. हेमंत मो. गुजराथी | कनिष्ठ अधिकारी | सीआयसीडी |
| श्री. सतीश प्र. टंकसाळे | कनिष्ठ अधिकारी | सहकारनगर |
| श्री. गोविंद सु. कुलकर्णी | कनिष्ठ अधिकारी | जालना रोड |
| श्री. मनसुख इं. लोढा | लेखनिक | कात्रज |
| श्री. मुगुटराव रा. गावडे | लेखनिक | कॅश सेल पुणे |
| श्री. रमेश द. शिंदे | लेखनिक | ओतूर शाखा |
| श्री. रमेश कि. खेडकर | लेखनिक | पिंपरी शाखा |
| श्री. सुरेश ब. तनपुरे | शिपाई | मार्केट यार्ड |

## लातूर शाखेमार्फत टेक्नोबेस सर्व्हिसेस कार्यक्रमाचे आयोजन



बँकेच्या लातूर शाखेमार्फत Technobase Services माहिती कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये मुख्य कचेरीतील मार्केटिंग अधिकारी श्री. संतोष बाम, डेटा सेंटरचे अधिकारी श्री. संदीप चव्हाण, श्री. संजय गायकवाड व नेट बँकिंगचे श्री. शरद शिंदे यांचा प्रामुख्याने सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात लातूर येथील प्रतिष्ठित महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स प्रा. लि. या कंपनीतून करण्यात आली. सर्वप्रथम महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स प्रा. लि. चे CEO श्री. अमित माशरु यांनी परिचय करून दिला. त्यानंतर शाखा व्यवस्थापक श्री. राजेंद्र वि. वर्तक यांनी प्रास्ताविक केले व कॅशलेस बँकिंगसाठी आवश्यक प्रोडक्ट्स बँकेने उपलब्ध करून दिल्याचे सांगितले तसेच जास्तीतजास्त टेक्नोबेस सुविधा वापरावी, यासंबंधी आवाहन केले. त्यानंतर श्री. संदीप चव्हाण यांनी डेटा सेंटर व DR - site बाबत व अन्य टेक्नोबेस्ड सुविधांचे सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच श्री. शरद शिंदे यांनी नेट बँकिंगविषयी विस्तृत माहिती दिली व त्यानंतर श्री. संतोष बाम यांनी बँकेच्या अन्य व्यवसायासंदर्भात प्रोडक्ट्सबाबत माहिती दिली. श्री. अमित माशरु यांनी आभार मानले.

## टिळक रोड शाखेतर्फे रेराॲक्ट २०१६ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

टिळक रोड शाखेतर्फे रेरा ॲक्ट २०१६ या विषयावर पुणे शहरातील नामवंत वकील श्री. प्रमोदजी बेंद्रे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रम शाखेचे सर्व बांधकाम व्यवसायाशी संबंधित खातेदार, सनदी लेखापाल, आर्किटेक्ट, इ. यांना आमंत्रित केले होते. शाखेचे मान्यवर खातेदार व मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष श्री. गजेंद्रजी पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्याचप्रमाणे सदर कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंदजी खळदकर व मुख्य कचेरीतील सहमहाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यपसाहेब, उपमहाव्यवस्थापक श्री. सोहोनीसाहेब, श्री. ढवळीकरसाहेब व श्री. बर्वेसाहेब उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला टिळक रोड शाखेचे व्यवस्थापक श्री. महेश काळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय व श्री. प्रमोदजी बेंद्रे यांचा परिचय करून दिला व बँकेत सध्या उपलब्ध असणाऱ्या टेक्नो-बेस्ड सर्व्हिसेस व बँकेच्या एकूण व्यवसाय वाढीच्या संदर्भात माहिती दिली.

त्यानंतर श्री. बेंद्रे यांनी रेरा ॲक्ट, २०१६ या संदर्भात सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले आणि सदर कायद्यामध्ये ग्राहकांना मिळालेले संरक्षण व बांधकाम व्यावसायिकांच्या दृष्टीने घातलेले निर्बंध यांबाबत संपूर्ण माहिती दिली. यानंतर मा. श्री. गजेंद्रजी पवार यांनी उपरोक्त विषयाची संक्षिप्त माहिती देऊन, बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंदजी खळदकर व टिळक रोड शाखा व्यवस्थापक श्री. महेश काळे यांचे आभार मानले आणि शाखेने ग्राहकांच्या माहितीकरिता यासारखे कार्यक्रम सतत आयोजित करावेत, असेही सांगितले.

मा. शाखा व्यवस्थापक श्री. महेश काळे यांनी सदर कायदा लागू झाल्यानंतर बांधकाम व्यावसायिकांना एस्क्रो खाते जनता सहकारी बँक व टिळक रोड शाखेत उघडण्यासंदर्भात आवाहन केले आणि सदर सेवा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले.

सभेच्या शेवटी श्री. हेमंत भट (सहा. शाखा व्यवस्थापक, टिळक रोड शाखा) यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे, मुख्य कचेरीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे, उपस्थित लोकांचे आणि सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे आभार मानून सभेची सांगता पूर्ण केली.

## सहकारी बँकांनी आपल्या कार्यपद्धतीत काळानुरूप बदल करावेत : राज्यपाल राम नाईक



"To Hell... and Back to Glory" The Phenomenal Success Story of Janata Bank **या पुस्तकाचे प्रकाशन करताना उत्तर प्रदेशचे मा. राज्यपाल राम नाईक.**

**मुंबई** – २० मे २०१७ : महाराष्ट्राबरोबरच देशभरातील सहकारी बँकांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून आपल्या कार्यपद्धतीत आवश्यक ते बदल करण्याची नितांत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन उत्तर प्रदेशचे मा. राज्यपाल राम नाईक यांनी येथे केले.

अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांनी बँकेच्या खडतर वाटचालीवर लिहिलेल्या 'नवल वर्तले' या मराठी पुस्तकाच्या "To Hell...and Back to Glory" The Phenomenal Success Story of Janata Bank या इंग्रजी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल मा. राम नाईक यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खासदार मा. विनय सहस्रबुद्धे, प्रसिद्ध उद्योजक श्री. दीपक घैसास, इंकिंग इनोव्हेशन्स या प्रकाशन संस्थेचे संचालक श्री. आनंद लिमये आदी मान्यवर उपस्थित होते. मा. राज्यपाल नाईक म्हणाले, "जनता सहकारी बँकेच्या खडतर प्रवासावर प्रकाश टाकणारे हे पुस्तक सर्वच सहकारी बँकांना मार्गदर्शक ठरणार आहे. सहकारी बँकांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून काळानुरूप आपल्या कार्यपद्धतीत आवश्यक ते बदल करण्याची गरज आहे. तसे न झाल्यास या बँका इतिहासजमा होण्याचा धोका संभवतो."

मा. खळदकर म्हणाले, "संकटांतून बँकेला बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळ, सभासद, ग्राहक, कर्मचारी यांचे योगदान महत्त्वाचे होते. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच बँकेला चांगले दिवस बघायला मिळाले. या सर्व घटना मी फक्त पुस्तकरूपाने शब्दबद्ध केल्या आहेत."

भविष्यातील बँकिंग कसे असेल, यासंबंधी बोलताना श्री. घैसास म्हणाले, "बँकांपेक्षा बँकिंग सेवेला आता महत्त्व येणार आहे. "सध्या सर्वच क्षेत्रांतील संस्थांची घसरण होताना दिसत आहे. अशा काळात एखादी संस्था घसरणीवर मात करत खंबीरपणे कशी उभी राहू शकते, याची कहाणी या पुस्तकात वाचायला मिळते. हे पुस्तक सर्वच बँकांसाठी प्रेरणादायी आहे" असे सांगून खासदार सहस्रबुद्धे म्हणाले, की, व्यवसायनिष्ठता, ध्येयवाद, विचारनिष्ठा म्हणजे काय, हे या पुस्तकातून आपल्याला वाचायला मिळेल. प्रकाशक आनंद लिमये यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

# आपल्या बँकेचा समाजकार्यात अभिमानास्पद सहभाग!



कोल्हापूर रस्ते सौंदर्यीकरण प्रकल्पांतर्गत कोल्हापूर पोलीस उद्यानामध्ये उभारण्यात आलेल्या ३०३ फूट उंचीच्या ध्वजस्तंभाचे अनावरण आणि नूतनीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्रदिनी करण्यात आले.

या वेळी महसूलमंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील, गृहराज्यमंत्री दीपक केसरकर, अभिनेता अक्षयकुमार, बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर, संचालक जगदीश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. खळदकर व श्री. कदम यांच्या हस्ते कोल्हापूरच्या पोलीस कल्याण निधी संस्थेला पाच लाख रुपयांचा निधी मा. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

''अशा प्रकारच्या समाजकार्यात सहभागी होत असल्याचा आम्हाला अभिमान आहे'', असे वक्तव्य या वेळी श्री. खळदकर यांनी केले. या सोहळ्याच्या वेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, ''देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत उंच राष्ट्रध्वज उभारण्याचे ऐतिहासिक कार्य कोल्हापूरमध्ये घडले आहे.

येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनामध्ये हा ध्वज देशभक्तीची ऊर्जा निर्माण करेल. या निमित्ताने आज कोल्हापूरने महाराष्ट्राला एक नवी ओळख दिली आहे.

महाराष्ट्रदिनी राज्यातील सर्वांत उंच आणि देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत उंच राष्ट्रध्वज भेट दिल्याबद्दल कोल्हापूरकरांचे अभिनंदन केले पाहिजे.''

# विनीतच्या जिद्दीला सलाम!

सहकारनगर शाखेचा खातेदार चि. विनीत अजय कुलकर्णी हा जन्मत:च कर्णबधिर. जन्माच्या वेळी तो खूप काळानिळा पडला. त्याला २ तास ऑक्सिजनवर ठेवावे लागले. त्यामुळे त्याच्या कानावर परिणाम झाला, असे डॉक्टरांचे म्हणणे पडले. परंतु त्याच्या ॲक्टिव्हिटी या नॉर्मल मुलाप्रमाणेच होत्या. त्यामुळे त्याचा हा प्रॉब्लेम आमच्या तो जवळपास पावणे दोन वर्षांचा झाल्यावर लक्षात आले आणि त्यापुढे सुरू झाला तो एक संघर्षमय प्रवास.



विनीत हा कर्णबधिर होताच, त्याबरोबरच hyperactive ही होता. औषधे, स्विमिंग, सायकलिंग तसेच खेळ या सगळ्या प्रयत्नांमुळे तो हळूहळू सगळ्या गोष्टी शिकायला लागला. एका जागेवर क्षणभरही शांत न बसणारा मुलगा हळूहळू कॉम्प्युटरशी मैत्री करू लागला. म्हणून मग १२वीनंतर त्याला आम्ही कॉम्प्युटरचा १ वर्षाचा प्रोग्रामिंगचा कोर्स करायला दिला. त्यानंतर त्याने ३ वर्षे ॲनिमेशनचा डिप्लोमा केला. त्याने बाल कल्याण संस्थेमार्फत अपंगांच्या स्पर्धेत भाग घेतला आणि कॉम्प्युटरमध्ये दोनदा बक्षीस मिळवले.

ॲनिमेशन केल्यानंतर त्याला ज्या ठिकाणी तो शिकला, तेथेच त्यांनी अनुभवासाठी त्याला एक वर्षभर थोडासा पगार देऊन ठेवून घेतले आणि मग त्याचा आत्मविश्वास वाढला.

त्यानंतर त्याला बाणेरला कंपनीमध्ये नोकरी स्वत:च्या Talent वर मिळाली. आज ५ वर्षे झाली, तो नोकरी करतो आहे. त्याबरोबरच त्याने त्याच्यासारख्याच ऐकू न येणाऱ्या मुलांचा (B.B.I.N.A.) या नावाने एक ग्रुप बनवला आहे. तो दिवाळीत पणत्या, आकाशकंदील तसेच राखी पौर्णिमेला राख्या असे या मुलांकडून बनवून घेतो आणि त्यांना पैसे देतो.

आता त्याला स्वत:सही असे वाटत आहे की आपल्यासारखीच अनेक मुले एकत्रित करून त्यांच्यासाठी काही उपक्रम राबवायला हवेत. जेणेकरून समाजात इतरांसारखाच आत्मविश्वास सर्वांमध्ये येईल.

विनीतची ही वाटचाल म्हणावी तितकी सोपी नाही. पण विनीत आणि आम्ही (आई-वडिलांनी) त्याचा फार बाऊ न करता तो सहज कसा होईल, यासाठी प्रयत्न केले.

विनीत हा आपल्या बँकेचे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. अजय सिद्धेश्वर कुलकर्णी यांचा सुपुत्र आहे.

# लातूर शाखेतर्फे नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांचे अभिनंदन

सन्माननीय खातेदार 'श्री. सुरेश पवार' हे लातूर महानगरपालिका येथे महापौर झाले असून शाखेचे अन्य सन्माननीय खातेदार 'श्री. देवीदास काळे' हे उपमहापौर झाले आहेत.

शाखेच्या वतीने शाखा व्यवस्थापक श्री. वर्तक व उपशाखाव्यवस्थापक श्री. गोवर्धन यांनी श्री. सुरेश पवार व श्री. देवीदास काळे यांचे अभिनंदन केले.

| शाखा वर्धापनाच्या शुभेच्छा! (जुलै ते सप्टेंबर २०१७) | |
|---|---|
| १. चिपळूण | ४ जुलै |
| २. इचलकरंजी | ४ जुलै |
| ३. सांगली | ४ जुलै |
| ४. कराड | ४ जुलै |
| ५. गडहिंग्लज | ४ जुलै |
| ६. जवाहर नगर | ४ जुलै |
| ७. जयसिंगपूर | ४ जुलै |
| ८. मोशी | २७ जुलै |
| ९. धनकवडी | २९ जुलै |
| १०. जालना रोड | १९ ऑगस्ट |
| ११. पेण | १९ ऑगस्ट |
| १२. घाटकोपर | २५ ऑगस्ट |
| १३. बोरिवली | २५ ऑगस्ट |
| १४. चंदननगर | २६ ऑगस्ट |
| १५. उदगीर | १४ सप्टेंबर |
| १६. सहकारनगर | २७ सप्टेंबर |

### वासंतिक क्रिकेट स्पर्धेत आपल्या बँकेस विजेते पद प्राप्त

पुणे जिल्हा क्रिकेट संघटना आयोजित वासंतिक क्रिकेट स्पर्धेत आपल्या बँकेच्या संघाने गट विजेते पद मिळविलेले आहे. या स्पर्धेमध्ये बँकेतील सेवक श्री विजय रजपूत, सुदीप परांजपे, आनंद कंदलगावकर, अतुल लेंडघर, आनंद बेडदूर, योगीराज टकले इत्यादींनी उकृष्ट खेळ केला.




सोबत बक्षीस स्वीकारताना विजय रजपूत, सुदीप परांजपे, अतुल लेंडघर

## गिरगाव शाखेचे लेखनिक निलेश सावंत यांची कौतुकास्पद विश्वासार्हता



आपल्या गिरगाव शाखेमध्ये लेखनिक म्हणून काम करत असलेले श्री. निलेश सावंत हे शाखेमध्ये काम करत असताना त्यांना अंदाजे १३ लाख किंमतीचा सोन्याच्या दागिन्यांचा पाऊच आढळला. त्यांनी लगेचच तो शाखा व्यवस्थापकांच्या ताब्यात दिला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जयंत काकतकर यांनी याबद्दल विशेष दखल घेऊन त्यांचे पत्र पाठवून कौतुक केले आहे.

## माखजन शाखा नवीन जागेत स्थलांतरित



**स्थलांतरित शाखेचे उद्घाटन बँकेचे संचालक मा. श्री. विजय भावे व मा. श्री. सुधीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.**

बँकेच्या माखजन येथील शाखेचे सोमवार दिनांक १० एप्रिल २०१७ रोजी नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले. या नवीन स्थलांतरित शाखेचे उद्घाटन बँकेचे संचालक मा. श्री. विजय भावे व मा. श्री. सुधीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. याच वेळी या शाखेतील एटीएम केंद्राचे उद्घाटन बँकेचे माजी संचालक मा. श्री. मनोहरशेठ भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, बँकेचे वरिष्ठ अधिकारी, मान्यवर सभासद, खातेदार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन स्थलांतरित शाखा, राजेंद्र खातू यांची इमारत, तलाठी कार्यालयासमोर, माखजन, तालुका संगमेश्वर, जिल्हा- रत्नागिरी ४१५ ६०८ येथे सुरू करण्यात आली आहे. नव्या प्रशस्त शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार बँकिंग सेवासुविधा देण्यात येणार आहेत.

## अहमदनगर शाखेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा



अहमदनगर शाखेचा प्रथम वर्धापन दिन दि. २५/५/२०१७ रोजी साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे दिवशी शाखेत भारतमाता पूजन करण्यात आले. त्या दिवशी शाखेने उद्घाटनासाठी शाखेचे सभासद, खातेदार, कर्जदार, ठेवीदार यांना आमंत्रित केले होते व त्यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून शाखेचा वर्धापन दिन साजरा केला.

शाखेचे प्रथम सभासद श्री. दत्तात्रय घोलप, प्रथम ठेवीदार व बँकेचे माजी सेवक श्री. किशोर थिटे, प्रथम कर्जदार व महिला प्रतिनिधी म्हणून सौ. अंबिका बंडी व सौ. विद्या जगताप यांचे हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमास रा.स्व. संघ जनकल्याण समितीचे प्रांताध्यक्ष व मा. जिल्हा संघचालक डॉ. रविंद्र साताळकर, प्रांत संपर्क प्रमुख श्री. रविंद्र मुळे व हिंद सेवा मंडळाच्या उपकार्याध्यक्षा व राष्ट्र सेविका समितीच्या विभाग कार्यवाहिका सौ. रोहिणीताई शिवलकर यांची विशेष उपस्थिती होती. चहापान व पेढे देऊन सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. चंद्रशेखर जोशी यांनी केले. सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार शाखा व्यवस्थापक श्री. मकरंद जोशी यांनी मानले. दिवसभराच्या या कार्यक्रमाला शाखेतील व नगर शहरातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## छंदामधून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल!

मातीचा अभ्यास मी शालेय जीवनापासूनच सुरू केला. शरीरातील उष्णता व विद्राव्ये नैसर्गिकरीत्या बाहेर काढण्यासाठी मातीवर विविध संस्कारांचे प्रयोग केले. पाणी पिण्यास उपयुक्त अशा विविध आकारांच्या मातीच्या बाटल्या, तांब्या-भांडी, स्वयंपाकाची भांडी बनवली. ही मातीची भांडी बनविताना त्यामध्ये तुळस, आवळा यांसारखे विविध उपयोगी घटक वापरले आहेत.





या मातीच्या भांड्यांमधून स्वयंपाक केल्याने व या बाटलीतून पाणी प्यायल्याने कॅल्शिअम, लोह यांसारखे एकूण १८ उपयुक्त घटक शरीरास मिळतात. तसेच मातीच्या भांड्यातून अन्न शिजवल्यास अन्नातील पोषक तत्त्वांचे प्रमाण कायम राहते.

माझा हा प्रयोग माननीय नरेंद्र मोदी व सर्व मंत्रिमंडळाला दिवाळी भेट म्हणून देण्यास निवडण्यात आला होता.

तसेच मी केंद्रीय मंत्री मा. जावडेकर, महापौर मा. मुक्ता टिळक, खादी ग्रामोद्योग चेअरमन विशाल चोरडिया अशा अनेक मान्यवरांनीही माझ्या या प्रयोगाची प्रशंसा करून मला प्रोत्साहन दिले.

**– सौ. देवयानी राकेश तांबोळी**
मार्केटिंग विभाग – कनिष्ठ अधिकारी
मो. – ९९७००२२३२९

# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला’

## आवड आणि नैसर्गिक ओढा

● निसर्गविषयक (नेचर, इकॉलॉजी अ‍ॅन्ड एन्व्हायर्नमेंट, कॉन्झर्व्हेशन रिलेटेड): निसर्ग संवर्धन, पर्यावरण संवर्धन, वनस्पती लावणे/जगवणे, अरण्यात भ्रमंती, संशोधन, प्राणिसृष्टीबाबत संशोधन, नाहीशा होणाऱ्या प्रजातींचे संवर्धन इत्यादी.

● विश्वास, श्रद्धाविषयक (फेथ ओरिएन्टेशन) : आत्मविश्वास, श्रद्धापूर्वक आचरण, मूल्यांवर आधारित कार्यपद्धत इत्यादी.

आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वरील ८ ओरिएन्टेशन्सचा आपण विचार करणार आहोत.

‘‘सर, क्षमता आणि कल यांमध्ये नक्की काय फरक आहे? तसेच कल असेल आणि तो आणखी वाढवायचा असेल, तर काय करावे?’’ मनोज म्हणाला.


**क्षमता आणि कल यांतील फरक :**

मनोज, पूर्वी तुम्हाला क्षमता आणि कल यांबद्दल फक्त माहिती दिली होती. तुझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर थोडक्यात असे :

क्षमता आपल्या प्रगतीमधून क्वचितच व्यक्त होत असतात. बऱ्याचदा काही क्षमता आपल्यात आहेत, हे आपण जाणत नाही. कल हे प्रामुख्याने आपल्या कृतीमधून प्रकट होत असतात. उदाहरणार्थ, ज्ञानवृद्धी करण्याचा तुमचा कल तुमच्या कृतीमधून जाणवतो.

समज, तू एखादा प्रकल्प करत आहेस, त्यानिमित्त काही माहिती मिळवायची आहे, तर तुझ्या समोर दोन पर्याय आहेत :

पहिला पर्याय म्हणजे आपत्धर्म म्हणून काही जुजबी माहिती मिळवायची आणे मोकळे व्हायचे. हा प्रकार ज्ञानवृद्धी करत नाही. कारण इथे मनापासून हाती घेतलेले काम पूर्ण केलेले दिसत नाही.



**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

दुसरा पर्याय म्हणजे मन लावून काम करणे. या कामातून आपल्याला काही शिकायला मिळणार आहे, अशी मानसिकता असणे आणि प्रकल्पाच्या विषयाशी निगडित प्रत्येक गोष्टीचा मागोवा घेऊन त्या विषयावर लहानसा शोधनिबंधच लिहिणे.

दुसरा पर्याय ज्ञानवृद्धी करण्याचा कल (knowledge orientation) वाढवतो. कोणतेही काम मनापासून केलेस, तर तुझ्या प्रत्येक कृतीमधून तुझा ज्ञानवृद्धी करण्याचा कल वाढत राहणार आहे.

म्हणूनच एखादा कल आपल्यात आहे किंवा नाही, हे सर्वस्वी आपल्या कृतीमधून व्यक्त होत राहते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ‘एखाद्या विषयात आपला रस वाढतो आणि पुढे त्या विषयाबद्दल आपण झपाटून जातो आणि याला गुणवत्तेची जोड मिळाली, तर आपण त्या क्षेत्राच्या शिखराकडे सतत वाटचाल करीत राहतो.’

‘‘सर, फेथ किंवा विश्वास हा एक प्रकारचा कल आहे, असे तुम्ही मागे सांगितले होते. त्याबद्दल थोडे जास्त सांगाल का?’’ सौरभ म्हणाला.

‘‘सर्वसामान्यपणे फेथ किंवा विश्वास हे देवाचे अस्तित्व किंवा धर्माची शिकवण मानणे, अशा अर्थाने अनेक जण समजतात. पण त्याचा वेगळा अर्थ आहे. तुमचा स्वत:वर पूर्ण विश्वास कधी असेल? तर जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट मनापासून केली असेल, सर्व गोष्टींचा विचार करून निर्णय घेतला असेल, घेतलेल्या निर्णयाचे जे परिणाम होतील, त्यांचाही विचार केला असेल आणि त्या परिणामांना तुम्ही स्वीकारण्यास सक्षम असाल, तर तुमचा विश्वास उत्तम असणार. तुम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये डगमगणार नाही. याचाच अर्थ तुमचा स्वत:वर पूर्ण विश्वास आहे.’’

आत्मविश्वास अनुभवाने तसेच ज्ञानसंपादनाने वाढत असतो. परीक्षा जवळ आली, की काही मुलांच्या किरकोळ आजारांच्या तक्रारी वाढतात. हे त्यांचा स्वत:वरचा विश्वास कमी असल्याचे लक्षण आहे. तसेच परीक्षा केंद्रात परीक्षा सुरू होण्याआधी सहज डोकावले, तर अनेक जण अगदी शेवटच्या क्षणापर्यंत म्हणजेच सुपरवायझरने ‘वह्या, पुस्तके बाजूला ठेवा,’ असे निक्षून सांगेपर्यंत नोट्स किंवा पुस्तके वाचताना दिसतात. ही कृती त्यांच्यातला आत्मविश्वासाचा अभाव दर्शविते. नोकरीसाठी मुलाखतीला येणाऱ्या बऱ्याच मुलांना मी खूप धास्तावलेले पाहिले आहे. तसेच अधिकारी व्यक्तीने भेटायला या, असे सांगितल्यावर अनेकांना मनात अनामिक भीती वाटते, का बरे मला बोलावले आहे, माझे काही चुकले का, अशा शंका त्यांच्या मनात येतात. ही सर्व स्वत:चा स्वत:वरील विश्वास कमी असण्याची लक्षणे आहेत.

**प्रेरणा**

ध्येय प्रेरणा (अ‍ॅचिव्हमेंट मोटिव्हेशन), नेतृत्व प्रेरणा (पॉवर मोटिव्हेशन) आणि आस्था, कणव प्रेरणा (अ‍ॅफिलिएशन मोटिव्हेशन) या तीन प्रेरणा सर्वांना असतात. असे असले, तरी आपल्या आजूबाजूच्या व्यक्ती सर्वसामान्यपणे वरीलपैकी एखादी प्रेरणा आपल्या वागणुकीमधून प्रकर्षाने दर्शवीत असतात. म्हणजे या प्रेरणा त्यांच्यात आहेतच, पण त्यांची या तिन्हींपैकी एखादी प्रेरणा तीव्र असते.

कोणतेही काम आपण करतो, तेव्हा ते काम उत्तम प्रकारे करण्यासाठी, यशस्वीरीत्या करण्यासाठी आपणास ध्येय प्रेरणा आवश्यक असते. महत्त्वाकांक्षा हीसुद्धा एक प्रकारची प्रेरणा आहे, असे मला वाटते. ज्या व्यक्तींमध्ये पॉवर मोटिव्हेशन तीव्र असते, अशा व्यक्ती महत्त्वाकांक्षी असतातच, पण त्यांना नेतृत्व करण्याची आवड व जिद्द असते.

किंबहुना आपले नेतृत्व ते निर्विवादपणे सिद्ध करतात. अशा व्यक्ती आपल्याला उद्योग, व्यवसाय, राजकारण, समाजकारण, इत्यादी अनेक क्षेत्रांत दिसतात. ज्यांच्यामध्ये इतरांबाबत/समाजासाठी आस्था, कणव, प्रेम इत्यादी भावना तीव्र असतात, ज्यांचे अ‍ॅफिलिएशन मोटिव्हेशन तीव्र आहे, अशा व्यक्ती शिक्षकी पेशामध्ये, समाजसेवेमध्ये तसेच समुपदेशक, मार्गदर्शक म्हणून कार्य करीत असतात.

**क्रमश:**

# हार्दिक अभिनंदन व मनःपूर्वक शुभेच्छा!

नुकताच जाहीर झालेल्या शालांत व उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये आपल्या बँकेतील सेवकांच्या पाल्यांनी खालीलप्रमाणे उज्ज्वल यश संपादन केले आहे.

| सेवकाचे नाव | पाल्याचे नाव | परीक्षा | निकाल |
|---|---|---|---|
| **जालना शाखा** | | | |
| गजानन कुलकर्णी | शांभवी कुलकर्णी | १० वी | ९५.०० |
| **मुख्य कचेरी** | | | |
| शेखर प्रभाकर जोशी | रजत शेखर जोशी | १२ विज्ञान | ७८.७७ |
| प्रकाश दशरथ टिळेकर | मनाली प्रकाश टिळेकर | १२ विज्ञान | ६५.०० |
| सचिन यज्ञेश्वर भिडे | सिद्धांत सचिन भिडे | १२ वाणिज्य | ८२.०० |
| मंगेश व्यंकटेश लांजेकर | नुपूर मंगेश लांजेकर | १० वी | ७२.०० |
| अनिल मनोहर गोटे | प्रथम अनिल गोटे | १० वी | ५२.०० |
| प्रकाश किसन इंगवले | ओंकार प्रकाश इंगवले | १२ विज्ञान | ७९.०० |
| निलेश श्रीधर पंडीत | ऋषिकेश निलेश पंडीत | १० वी | ८०.२० |
| आनंद च. कंदलगावकर | अनीश आ. कंदलगावकर | १० वी | ७९.४० |
| शशांक शिवाजी शेळके | रोहित शशांक शेळके | १० वी | ९२ |
| कल्याणी मनिष देशपांडे | मधुरा मनिष देशपांडे | १० वी | ९० |
| **बोरिवली शाखा** | | | |
| रविशंकर पु. वाव्हळ | श्रावणी रविशंकर वाव्हळ | १० वी | ९३.६० |
| **भवानी पेठ** | | | |
| निता एच. सातपुते | प्राची एच. सातपुते | १२ विज्ञान | ९०.०० |
| **सीबीओसी** | | | |
| मानसी गंगाधर नेने | केतकी गंगाधर नेने | १२ वाणिज्य | |

| सेवकाचे नाव | पाल्याचे नाव | परीक्षा | निकाल |
|---|---|---|---|
| **मार्केट यार्ड** | | | |
| सुनिल वा. परदेशी | कार्तिकी सुनिल परदेशी | १० वी | ८६ |
| राजू का. जांभुळकर | अखिलेश राजू जांभुळकर | १२ वी | ६० |
| **इचलकरंजी** | | | |
| श्रीधर माधव विसाळ | वेदांत श्रीधर विसाळ | १० वी | ९४ |
| **सेवकाचे नाव** | **पाल्याचे नाव** | **परीक्षा** | **निकाल** |
| **एनएसडीएल** | | | |
| प्रविण माधव खोपडे | संज्योत प्रविण खोपडे | १० वी | ८३ |
| नितीन शरणप्पा भंडारी | प्रथमेश नितीन भंडारी | १० वी | ८९.५ |
| **लातूर शाखा** | | | |
| ज्ञानोबा विठ्ठल पुजारी | निकिता ज्ञानोबा पुजारी | १२ वी | ७९.२३ |
| विवेक गजानन देशपांडे | सृष्टी विवेक देशपांडे | १० वी | ९४ |
| धनराज नेमीनाथ उपाध्ये | देविका धनराज उपाध्ये | १० वी | ९२ |
| संजय वामन देशमुख | भार्गव संजय देशमुख | १० वी | ८५ |
| **चिपळूण** | | | |
| प्रसाद मोरेश्वर कार्ले | वेदांत प्रसाद कार्ले | १० वी | ९४.२० |
| **रत्नागिरी** | | | |
| सुनिल वसंत मांडवकर | संकेत सुनिल मांडवकर | १२ वी | उत्तीर्ण |
| पराग प्रमोद नागवेकर | दीक्षा प्रमोद नागवेकर | १२ वी | उत्तीर्ण |

# विलेपार्ले शाखेचे नूतनीकरण

विलेपार्ले (पूर्व) मुंबई येथील नूतनीकृत शाखेचे उद्घाटन बुधवार दिनांक ५ एप्रिल २०१७ रोजी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते झाले. याच वेळी येथील एटीएम केंद्राचे उद्घाटन स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. प्रमोद लेले यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संचालक मा. श्री. अतुल बेडेकर, संचालक मा. श्री. विजय भावे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, मान्यवर सभासद, खातेदार, हितचिंतक व बँकेचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विलेपार्ले शाखा श्रीकुंज प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी हनुमान मंदिर रोड, मुंबई ४०० ०५७ विलेपार्ले (पूर्व) येथे कार्यरत आहे. या शाखेच्या माध्यमातून विलेपार्ले परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



**बँकेच्या विलेपार्ले (पूर्व) मुंबई येथील नूतनीकृत शाखेचे उद्घाटन करतांना अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, मान्यवर ग्राहक श्री. दीपक वाघानी व संचालक मा. श्री. अतुल बेडेकर**

**वाचकांना नम्र आवाहन :** गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ❊ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
**दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)**

२७/०७/२०१७